दि. १०.०९.२०१५

"दयानंद कलाच्या सचिवपदी ज्ञानेश्वर वडेकर"

लातूर - दयानंद कला महाविद्यालयातील विद्यार्थी परिषदेच्या सचिवपदाची निवडणूक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेडच्या नियमानुसार एकल संक्रमनिय गुप्त मतदान पद्धतीने नुकतीच शांततेच्या वातावरणात पार पडली. या निवडणूकीमध्ये बी.ए.तृतीय वर्षातील एन.सी.सी. विभागाचा ज्ञानेश्वर वडेकर याची बहुमताने निवड झाली. ही निवडणूक प्राचार्य डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, उपप्राचार्य व विद्यार्थी परिषदेचे मार्गदर्शक डॉ.एस.पी. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. क.म.वि.उपप्राचार्य बळवंत उटीकर, प्रा.डॉ.सुनील साळुंके, प्रा.डॉ. प्रदीप सूर्यवंशी, प्रा.डॉ.संतोष पाटील, प्रा.डॉ.नितेश स्वामी यांनी निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी मोलाचे सहकार्य केले निवडणुकीचा निकाल निवडणूक निर्णय अधिकारी प्राचार्य डॉ जोगेंद्रसिंह बिसेन यांनी घोषित केला.

नवनिर्वाचित सचिव ज्ञानेश्वर वडेकर याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी पुष्पहार घालून स्वागत केले व महाविद्यालयाच्या भावी प्रगतीस हातभार लावण्याचे आवाहन केले.

नवनिर्वाचित सचिव ज्ञानेश्वर वडेकर याने सर्व मतदार वर्गप्रतिनिधींचे व प्राध्यापकांचे आभार मानले. मी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न करेन व महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविण्यासाठी मदत करेन, असे मत आपल्या मनोगतात त्याने व्यक्त केले.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, उपप्राचार्य डॉ.एस.पी.गायकवाड, उपप्राचार्य बळवंत उटीकर, प्रा.डॉ.सुनील साळुंके, प्रा.डॉ.प्रदीप सूर्यवंशी, प्रा.डॉ.संतोष पाटील, प्रा.डॉ.नितेश स्वामी, श्री.नवनाथ भालेराव, श्री.रमेश देशमुख व महाविद्यालयातील इतर प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी ज्ञानेश्वर वडेकर याचे अभिनंदन केले.

प्रति,
मा.संपादक/शहर प्रतिनिधी
दै.----------
शहर कार्यालय, लातूर

कृपया वरील बातमी पत्र आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्धीस देवून सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू ,

प्रसिद्धी प्रमुख
दयानंद कला महाविद्यालय, लातूर